# आपल्या भुयारी मेट्रोचे जपानला भलतेच कवतुक



लोकमत न्यूज नेटवर्क

**मुंबई :** मुंबई महानगर प्रदेशात सुरू असलेल्या पायाभूत सेवा-सुविधा प्रकल्पांपैकी 'भुयारी मेट्रो ३' हा प्रकल्प सर्वात महत्त्वाचा आहे. हा प्रकल्प मुंबईकरांची जीवनशैलीच बदलून टाकेल, असे म्हणत जपानचे मुंबई येथील काऊंसिल जनरल डॉ. यासुकता फुकाहोरी यांनी भुयारी मेट्रो ३ च्या कामावर स्तुतिसुमने उधळली आहेत.

मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनकडून मुंबईत कुलाबा-वांद्रे-सीप्झ या भुयारी मेट्रो-३ चे काम हाती घेण्यात आले आहे. या प्रकल्पाचे काम बऱ्यापैकी पूर्ण होत आले आहे. भुयारी मेट्रो-३ च्या कारशेडचा मुद्दा वगळला, तर उर्वरित सगळ्या अडचणी सोडविण्यावर कॉर्पोरेशनने भर दिला आहे. याच प्रकल्पाची यासुकता फुकाहोरी यांनी नुकतीच पाहणी केली.

## प्रस्तावित मेट्रो कारशेडच्या स्थानांची पाहणी

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्यावतीने मुंबई महानगर प्रदेशात मेट्रो प्रकल्पांचे काम वेगाने हाती घेण्यात आले आहे. या प्रकल्पांच्या विकासकामांची महानगर आयुक्त एस. व्ही. आर. श्रीनिवास सातत्याने पाहणी करत आहेत. श्रीनिवास यांनी मेट्रो २ अ आणि मेट्रो ९ च्या प्रगतीच्या कामाचा आढावा घेतला. राईमुर्धे येथील प्रस्तावित मेट्रो कारशेडच्या स्थानांची पाहणी केली. दहिसर येथे सुरू असलेल्या स्थानकांच्या सुरू असलेल्या कामांची तपासणी केली.